# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२**

## महिला व बालविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एक्स-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: ३६७, रूपये:- ३०,८६,६२,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४६३९ | १०० | ''नंदुरबार जिल्ह्यात मागील काही महिन्यात पाच वर्षापर्यंतच्या वयोगटातील तब्बल ११२२ बालके आणि २६ मातांचा मृत्यू झाल्याची बाब उच्च न्यायालयामध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत आवश्यक तो निधी महिला व बाल विकास विभागाला उपलब्ध करून देऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' |
| | | | **श्री. अजित पवार,कुमारी आदिती तटकरे** |
| (२) | ४६४० | १०० | ''कोरोना संसर्गाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसऱ्या लाटेचा तडाखा प्रामुख्याने महिलांना सर्वाधिक बसलेला असणे या लाटेमध्ये तरुण जोडीदार गमावलेल्या तिशीच्या आतील महिलांची संख्या लक्षणीय असणे, जोडीदार गमावलेल्या महिलांच्या मुलांसाठी उपयुक्त असलेल्या बालसंगोपन योजनेसाठी अकराशे रुपयांची रक्कम अडीच हजार रुपये करण्याचा निर्णय जाहीर केलेला असणे, महिला बालकल्याण विभागाने अद्याप यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केलेला नसणे, इतर राज्यांच्या तुलनेने राज्यातील वास्तल्य योजनेत अत्यंत तुटपुंजी मदत दिली जात असल्यामुळे अन्य राज्यांच्या धर्तीवर राज्य सरकारने निर्णय घेण्याची आवश्यकता याकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील नागरिकांमध्ये राज्य शासनाबद्दल निर्माण झालेली नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' |
| (३) | ४६४२ | १०० | ''अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना तसेच गर्भवती अथवा स्तनदा माता यांना दररोज ताजा सकस आहाराचा पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटांना सहा महिन्यांपासून देयके अदा करण्यात आलेली नसणे, 90 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून देखील बचत गटाच्या महिलांना महिला व बालविकास आयुक्त कार्यालयात खेटे घालावे लागत असणे, वस्तूतः महिला बचत गट महिनाभर सेवा दिल्यानंतर खर्चाची देयके विकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सादर केल्यानंतर ती अदा करणे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक असताना मोठ्या प्रमाणावर देयके थकल्यामुळे या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर पडत असलेला दुष्परिणाम त्यामुळे राज्यातील नागरिकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र नाराजी यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४) | ४५९७ | १० | अमरावती जिल्ह्यातील बालसंगोपण योजनेतंर्गत अर्ज केलेल्या व अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अनुदान अद्यापपर्यंत मिळाले नसल्याने बहुतांश लाभार्थी तालुका स्तरावर तसेच जिल्हास्तरावरील महिला व बालविकास कार्यालयात तगादा लावत आहे. परंतु शासनामार्फत अनुदान उपलब्ध नसल्याने लाभार्थी अनुदानांपासून वंचीत आहे. सदर योजने अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांचे अनुदान त्यांचे रखडलेले अनुदान तात्काळ अदा करण्यात यावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ४५११ | १० | पालघर जिल्ह्यात तीन ते सहा वयोगटातील लाभार्थी बालकांना अंगणवाडी सेविंकामार्फत गरम ताजा आहार सुरू करण्यासाठी शासनाने निर्देशित केलेले असणे, त्या अनुषंगाने माध्यान्ह पोषण आहाराच्या नावाखाली राज्य शासनाकडून पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे किडक्या धान्याद्वारे तयार केलेला गरम ताजा आहार अंगणावाड्यांमधील लहान बालकांना दिला जात असणे, राज्य सरकारकडून पुरविल्या जाणाऱ्या धान्याचा दर्जा असमाधानकारक व निकृष्ट धान्याच्या तक्रारी महिला व बालविकास विभागाकडे प्राप्त झालेल्या असूनही शासनाकडून अद्यापही कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी किडक्या धान्याद्वारे तयार केलेला गरम ताजा आहार आदिवासी बालकांवर खाण्याची वेळ आली असल्याने विद्यार्थ्यांच्या पोटाचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, परिणामी अंगणवाड्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एक्स-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: ३७५, रूपये:- ४,८२,०५,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (६) | ४५१५ | १० | राज्यातील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत तसेच प्रसुतीनंतर शारीरीकी क्षमता नसतानाही मजुरीसाठी काम करावे लागणे, अशा गर्भवती महिला व माता कुपोषित राहून त्यांचे व त्यांच्या नवजात बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करुन त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे तसेच माता व बालकांचे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आरोग्य सुदृढ राखून बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने ( Ministry of Women and Child Development ) पंतप्रधान मातृ वंदना योजना दिनांक 8 डिसेंबर 2017 पासुन राज्यात आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असणे, माता मृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन ती नियंत्रितासाठी संपूर्ण देशात राबविण्यात येत असणे, या योजनेत केंद्र शासनाचा 60 टक्के तर राज्य शासनाचा 40 टक्के सहभाग असणे, पंतप्रधान मातृ वंदना योजनेतून पहिल्या अपत्यासाठी गरोदर मातांना (5,000 ) रुपये पाच हजार रुपयाची मदत तीन टप्प्यात दिली जात असणे, पहिल्या टप्यात गरोदरपणाची 150 दिवसांच्या आत नोंदणी केल्यास 1 हजार ©he³es, तर दुसऱ्या टप्प्यात सहा महिन्यानंतर 2 हजार रुपये दिले जात असणे, पालघर जिह्यातील विशेषत वसई तालुक्यातील गरोदर व स्तनदा महिलांना या योजनेचा लाभ मिळण्याकरीता अनेक गरोदर लाभार्थी महिलांनी वसई विरार शहर महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये व पालघर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नोंदणी केलेली असतानाही माहे एप्रिल 2022 पासुन गरोदर व स्तनदा महिलांना पंतप्रधान मातृ वंदना योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यास आला नसल्याची बाब माहे डिसेंबर, 2022 मध्ये उघडकीस येणे, पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील अनेक भागात कुपोषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असतांनाही या योजनेची शासन स्तरावर अंमलबजावणी करण्यास होत असलेली दिरंगाई, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, यासाठी शासनाने पालघर जिह्यातील वसई तालुक्यातील गरोदर व स्तनदा महिलांना पंतप्रधान मातृ वंदना योजनेचा लाभ लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनस्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २१ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महिला व बालविकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर